आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
०२ मे २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- किनारपट्टीवरची राज्यं आणि बंदरांची शहरं विकसित भारताच्या वाटचालीत महत्त्वाची भूमिका बजावतील, असं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- केरळमधल्या विळिंजम इथं देशातल्या पहिल्या अर्धस्वयंचलित बंदराचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

- प्रधानमंत्री मोदी आंध्रप्रदेशात करणार ५८ हजार कोटी रुपये खर्चाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पाची पायाभरणी आणि लोकार्पण

**आणि**

- देशाच्या अनेक भागात अवकाळी पाऊस / दिल्लीत पावसाचे ४ बळी

**<><><><><>**

किनारपट्टीवरची राज्यं आणि बंदरांची शहरं विकसित भारताच्या वाटचालीत महत्त्वाची भूमिका बजावतील, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. केरळात तिरुवअनंतपुरम मध्ये विळींजम इथं खोल पाण्यातल्या आंतरराष्ट्रीय बहुउपयोगी बंदराचं उद्घाटन आणि लोकार्पण आज मोदी यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. आतापर्यंत भारतातली ७५ टक्के समुद्र मार्गाने होणारी आयात ही परदेशातल्या बंदरांवर होत होती. ही सर्व प्रक्रिया अत्यंत खर्चिक होती. आता मात्र, या विळिंजममुळे हा खर्च वाचणार असून त्याचा उपयोग केरळवासियांसाठी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करण्यासाठी होईल, असंही मोदी यावेळी म्हणाले.

**होल्ड.. बाईट - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी**

या सोहळ्याला केंद्रीय बंदरे, नौवहन आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल, केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर, मुख्यमंत्री पिनराई विजयन यांच्यासह अन्य

मान्यवर उपस्थित होते. विळींजम इथे ८ हजार ८०० कोटी रुपये खर्चून उभारलेलं हे बंदर देशातलं पहिलं अर्धस्वयंचलित तसंच खोल पाण्यातली कंटेनर वाहतूक करणारं बंदर ठरणार आहे. विळिंजम बंदरामुळे भारत, मध्य आशिया आणि युरोपदरम्यान दळणवळणाचा सोयीचा मार्ग उपलब्ध होणार आहे.

<><><><><>

मुंबईत सुरु असलेल्या वेव्हज अर्थात जागतिक दृकश्राव्य शिखर परिषदेत दुसऱ्या दिवशी आज भारत-अमेरिका सर्जनशीलता परिससंस्थेला चालना देण्यासाठी सत्र आयोजित करण्यात आलं. अमेरिकेचे काऊन्सलर माईक हँकी यांनी या सत्राचं उद्घाटन केलं आणि उपस्थितांना संबोधित केलं.
तसंच जागतिक माध्यम संवाद कार्यक्रमाचं आयोजनही आज करण्यात आलं. परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव आणि माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल मुरुगन यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

वेव्हज् परिषदेत जगभरातले आशय निर्माते, विविध माध्यम समूहांचे प्रमुख कार्यकारी अधिकारी सहभागी होत आहेत. या परिषदेतून निर्माण होणाऱ्या संधीविषयी क्राफ्टन इंडियाचे वरिष्ठ अधिकारी सौरभ शहा यांनी अधिक माहिती दिली...

**होल्ड... बाईट - सौरभ शहा**

<><><><><>

भारत-युरोपीयन संघ मुक्त व्यापार कराराला या वर्षअखेरीपर्यंत मूर्त स्वरुप येईल असा विश्वास वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल आणि युरोपियन संघाचे व्यापार आणि आर्थिक सुरक्षा आयुक्त मारोश सेफकोविच यांनी व्यक्त केला आहे. बेल्जियममध्ये ब्रुसेल्स इथे काल झालेल्या एका महत्त्वाच्या बैठकीत दोन्ही बाजूंनी जागतिक व्यापार आव्हानांचा सामना करण्याविषयी चर्चा झाली.

या बैठकीत व्यावसायिकांसाठी बाजारपेठेत प्रवेश वाढवणं, विश्वासार्ह तसंच वैविध्यपूर्ण पुरवठा साखळ्यांना प्रोत्साहन देणं आणि दोन्ही अर्थव्यवस्थांच्या वाढीला चालना देण्यासाठी भागीदारी दृढ करणं यावर चर्चा झाल्याची माहिती गोयल यांनी आपल्या समाजमाध्यमावर दिली. या बैठकीची पुढची फेरी येत्या १२ मे ते १६ मे दरम्यान नवी दिल्लीत होणार आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज आंध्र प्रदेशच्या दौऱ्यावरही जाणार असून, अमरावती इथं त्यांच्या हस्ते ५८ हजार कोटी रुपयांच्या विविध विकास कामांची पायाभरणी होणार आहे. देशभरात जागतिक दर्जाची संरचना आणि संपर्क जाळे उभारण्याची वचनपूर्तीचा भाग म्हणून आंध्र प्रदेशातल्या सात राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचं उद्घाटन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होईल. तसंच सहा राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प आणि एका रेल्वे प्रकल्पाची पायाभरणीही ते करतील. या विकास कामांमध्ये विधानभवन, उच्च न्यायालय, सचिवालय आणि इतर प्रशासकीय इमारती तसंच रहिवासी इमारती तसंच एकता मॉल यांचा समावेश आहे. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते चौदाशे कोटी रुपये खर्चाच्या क्षेपणास्त्र चाचणीतळाची पायाभरणी करण्यात येणार आहे.

<><><><><>

लोकसभेचे सभापती ओम बिरला यांनी संसदेच्या प्राक्कलन समितीच्या अध्यक्षपदी भाजपा खासदार संजय जयस्वाल यांची नेमणूक केली आहे. ३० सदस्यांच्या या समितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत यांचा समावेश आहे. ही समिती शासकीय खर्चाचे अंदाज आणि विनिमयावर देखरेख ठेवते. सार्वजनिक उपक्रम समितीच्या अध्यक्षपदी भाजपा खासदार बैजयंत पांडा यांची नेमणूक केली आहे. या समितीत २२ सदस्य आहेत.

<><><><><>

ऑस्ट्रेलियातल्या सार्वत्रिक निवडणुकीसाठीच्या प्रचाराचा आज शेवटचा दिवस आहे. ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानीज यांनी त्यांचे विरोधक पीटर डटन यांच्या मतदारसंघात जाऊन प्रचारसभा घेतली. या निवडणुकीत लेबर पार्टी सत्ता कायम ठेवण्यात यशस्वी होईल, असं काही जनमत चाचण्यांमधून दिसून आलं आहे. महागाई, घरांच्या वाढत्या किमती हे या निवडणुकीतले मुद्दे होते, मात्र अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आकारलेल्या आयात शुल्काचा मुद्दाही या निवडणुकीत प्रमुख मुद्दा असल्याचं राजकीय विश्लेषक सांगतात. तर काही विश्लेषकांच्या मते ट्रम्प यांचा मुद्दा निवडणुकीत महत्त्वाचा नव्हता, मात्र अल्बेनिज यांच्या जोरदार प्रचारामुळे त्यांचं पारडं जड झालं आहे.

**<><><><><>**

उत्तराखंडमधल्या केदारनाथ मंदिराची कवाडं आज उघडण्यात आली. हिवाळ्यात सहा महिने बंद राहिल्यानंतर आज मंदिराचे दरवाजे भाविकांसाठी खुले करण्यात आले. मंदिर १०८ क्विंटल फुलांनी सजवण्यात आलं आहे. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी सपत्नीक केदारनाथाचं दर्शन घेतलं.

**<><><><><>**

आयपीएल टी-ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत  आज, गुजरात टायटन्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यातला  सामना अहमदाबाद इथं होणार  आहे.

जयपूरमधे काल झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सनं राजस्थान रॉयल्सचा १०० धावांनी पराभव केला. मुंबई इंडियन्सनं दिलेल्या २१८ धावांच्या उद्दिष्टाचा पाठलाग करताना राजस्थान रॉयल्सचा डाव ११७ धावांवर आटोपला.

**<><><><><>**

देशाच्या अनेक भागात उष्णतेची लाट कायम आहे. तर उत्तरेकडच्या काही भागात बंगालच्या उपसागरावरुन येणारे बाष्पयुक्त वारे आणि पश्चिमी वाऱ्यांच्या संघर्षामुळे वावटळीसदृश स्थिती निर्माण झाली आहे.

राजधानी दिल्लीत आज सकाळी वादळी वारे आणि पावसामुळे एक झाड कोसळून एकाच कुटुंबातल्या चार जणांचा मृत्यू झाला. द्वारका इथं खाराखरी नाहर गावात झालेल्या या दुर्घटनेत एक महिला तिच्या तीन मुलांसह मरण पावली, तर तिचा पती जखमी झाला. दक्षिण दिल्लीतल्या जाफरपूर कलान इथं एका घरावर झाड कोसळल्याने अनेक जण ढिगाऱ्याखाली अडकले. छावला इथंही घराचे छत कोसळल्याने चार जण ढिगाऱ्याखाली गाडले गेले. पण त्यांना सुखरूपपणे बाहेर काढण्यात आलं.

मुसळधार पावसामुळं अनेक ठिकाणी वाहतूक विस्कळीत झाली. तर सखल भागात पाणी साचलं होतं. विमान वाहतुकीवरही परिणाम झाला. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी आज सकाळी पाणी साचलेल्या मजनू का टीला या ठिकाणाला भेट देऊन पाहणी केली.

मध्य प्रदेशात गेल्या सहा दिवसांपासून काही ठिकाणी प्रचंड उष्णता आहे, तर काही ठिकाणी पाऊस आणि गारपीट होत आहे.

//<><><><><>//